ePaper
वर्ष - 9 । अंक -11 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com । मंगळवार, दि. 26 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मुंबई-पुण्यासह राज्यात गणेशोत्सवासाठी पोलिस दल सज्ज, सर्वत्र कडेकोट बंदोबस्त



### आतील पानांत

- चाहत्यांचा लाडका हिटमॅन!
- तुरुंगातून देश चालवायचा का?
- गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका!
- प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष”

## काँग्रेसचा संकेत : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ‘आघाडी’ नाही

# एकट्यानेच ‘पंजा’ लढवणार!

## आघाडी राज्य पातळीवर नाही, निर्णय स्थानिक पातळीवर

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार असून, या निवडणुकीत पक्षांच्या रणनितीबाबत हालचाली वेगाने सुरू आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळाले होते; पण त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत आघाडीला मोठा धक्का बसला. अशा पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेले विधान विशेष महत्त्वाचे ठरत आहे. सपकाळ यांनी स्पष्ट केले की, “स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य पातळीवर कोणतीही आघाडी होणार नाही. आघाडीचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात आले आहेत. शहर, तालुका, जिल्हा पातळीवर चर्चा करून एकमत झाल्यासच आघाडी करता येईल.”**



२०१७ च्या निवडणुका : बहुतेक ठिकाणी भाजपाने स्वतंत्र लढत सत्ता हस्तगत केली. महाविकास आघाडीतील घटक पक्ष स्वतंत्र स्पर्धेत उतरले आणि मतांचे विभाजन झाल्याने भाजपला थेट फायदा झाला. लोकसभा २०२४ : आघाडी म्हणून लढल्याने विरोधी पक्षांना यश मिळाले. पण लगेचच झालेल्या विधानसभा २०२४ मध्ये समन्वयाचा अभाव आणि नेतृत्वातील मतभेद यामुळे आघाडी पराभूत झाली.

स्थानिक राजकारण : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रामुख्याने प्रादेशिक व जातीय समीकरणांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे राज्य पातळीवरील आघाडीपेक्षा स्थानिक पातळीवरच जास्त निर्णय क्षमता लागते.




**महाविकास आघाडीत अस्थिरता वाढणार...**

काँग्रेसने आघाडीबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर सोडल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट/अजित पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट/शिंदे गट) यांच्यात समन्वय राखणे कठीण होईल. त्यामुळे आघाडी आणि युतीमध्ये अस्वस्थता निर्माण होणार आहे. याचा भाजपाला थेट फायदा होईल. आघाडीतील घटक पक्ष वेगळे लढले, तर मतांचे विभाजन होईल. याचा सर्वाधिक लाभ भाजप-शिंदे गट महायुतीला मिळेल. चार सदस्यीय प्रभाग पद्धतीत तर हे भाजपासाठी वरदान ठरू शकते.

स्थानिक नेत्यांचे महत्त्व वाढणार... राज्य पातळीवर नेतृत्व ठरवणार नाही, त्यामुळे स्थानिक पातळीवर सामंजस्याने आघाडी करणे की स्वतंत्र लढणे, हे स्थानिक नेत्यांवर अवलंबून राहील. यामुळे जिल्हा, तालुका, शहराध्यक्ष यांचे महत्त्व वाढेल.काँग्रेसने स्थानिक आघाडीचे धोरण स्वीकारल्याने तिच्या कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. पक्ष स्वतःच्या बळावर लढण्याची मानसिकता तयार होईल. राज्यभरात एकत्र लढतो का नाही, याबाबत मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. मतदारांचा विश्वास कमी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीकडे सक्षम उमेदवार नाहीत. महायुती झाल्यास मोठ्या प्रमाणात बंडखोरी होईल आणि मविआला उमेदवार उभे राहतील, असे चित्र आहे. त्यात महाविकास आघाडी स्वतंत्र लढण्यास उमेदवारांची जुळवाजुळव करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

## सपकाळ यांचा सरकारवर घणाघात

पत्रकार परिषदेत भाजपवर टीका करताना सपकाळ म्हणाले, “भारतीय जनता पक्ष लोकशाही विरोधी आहे. लाडकी बहीण योजनेत महिलांची फसवणूक करण्यात आली. तीन हजार रुपये देऊ असे सांगून फक्त दीड हजार रुपये दिले जात आहेत. अनेक बोगस अर्ज मंजूर झाले. अशा लाभार्थ्यांना वाटप झालेली रक्कम अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करावी आणि त्यांना तत्काळ सेवेतून बडतर्फ करावे.” राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी काँग्रेसच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत तणाव उघड होऊ लागला आहे. आघाडी टिकणार की प्रत्येक पक्ष स्वतंत्र लढणार, हे पुढील काही आठवड्यांत स्पष्ट होईल. परंतु एक गोष्ट निश्चित – आघाडीतील गोंधळाचा सर्वाधिक फायदा भाजपा-शिंदे गट महायुतीला होण्याची चिन्हे आहेत.

**महायुतीत संघर्ष?** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हरकती घेणार

# पिंपरीत प्रभाग रचनेवरून संघर्ष?

## प्रभाग रचनेचा भाजपला फायदा

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी २०१७ मधील प्रभाग रचना 'जैसे थे' ठेवण्यात आल्याने भाजपमध्ये उत्साहाचे, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) निरुत्साहाचे वातावरण आहे. चारसदस्यीय पद्धतीने झालेल्या प्रभाग रचनेचा फायदा होऊन भाजपची एकहाती सत्ता आली होती. ही प्रभाग पद्धत भाजपसाठी सोईची मानली जात असून महायुतीमधील राष्ट्रवादी (अजित पवार), शिवसेना (शिंदे) पक्षांची अडचण झाली असल्याने महायुतीमध्ये जुंपण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीत चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभाग तयार करण्यात आले होते. या प्रभाग रचनेचा भाजपला फायदा झाला. ७७ नगरसेवकांसह महापालिकेवर पहिल्यांदाच भाजपचे कमळ फुलले. राष्ट्रवादी काँग्रेसची १५ वर्षांपासून असलेली एकहाती सत्ता उलथवून टाकली. प्रभाग रचना तयार करताना भौगोलिक सलगता, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, रस्त्यांच्या नैसर्गिक मर्यादा विचारात घेतल्या नसल्याचा आरोप राष्ट्रवादीने केला होता. आता आगामी निवडणुकीसाठी २०१७ प्रमाणेच प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध केली आहे. २०१७ प्रमाणेच प्रभाग रचना झाल्याने भाजपने शंभरहून अधिक नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सर्व १२८ जागांवर ताकदीचे उमेदवार असून स्वबळावर लढण्याचा शहर भाजपचा आग्रह आहे. तर, प्रतिकूल प्रभाग रचना असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षामधील इच्छुकांमध्ये अस्वस्थता दिसून येत आहे. मागीलवेळी नैसर्गिक सीमांचे उल्लंघन केले होते. तीच प्रभाग रचना कायम ठेवल्याने या रचनेवर हरकती घेणार असल्याचे 'राष्ट्रवादी'कडून सांगण्यात आले. प्रभाग रचनेबाबत विरोधाभास असेल तर हरकत घेता येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही स्पष्ट केले आहे. २०१७ मध्ये प्रारूप प्रभाग रचनेवर एक हजार ४३० हरकती आल्या होत्या. त्यामध्ये तळवडे, चिखली गावठाण, सोनवणे वस्ती, मोरेवस्ती या प्रभाग क्रमांक एकबाबत सर्वाधिक एक हजार २९९ हरकती आल्या होत्या.

## भाजपचा स्वबळाचा नारा

राष्ट्रवादी काँग्रेसची १५ वर्षांपासून असलेली एकहाती सत्ता उलथवून टाकली. प्रभाग रचना तयार करताना भौगोलिक सलगता, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, रस्त्यांच्या नैसर्गिक मर्यादा विचारात घेतल्या नसल्याचा आरोप राष्ट्रवादीने केला होता. आता आगामी निवडणुकीसाठी २०१७ प्रमाणेच प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध केली आहे. भाजपने शंभरहून अधिक नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

आता २०१७ चीच प्रभाग रचना कायम असल्यामुळे किती हरकती, सूचना येतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. प्रभाग रचना 'जैसे थे' राहिल्याने मागीलवेळी ७७ नगरसेवक निवडून आलेल्या भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे. शंभरहून अधिक नगरसेवक निवडून आणण्याचा नारा भाजपने दिला असून ३२ प्रभागात ताकदीचे उमेदवार असल्याचे सांगितले जात आहे. स्वबळावर निवडणूक लढविण्याचा आग्रह शहर भाजपने धरला आहे. २०१७ प्रमाणेच प्रभाग रचना झाली. मागीलवेळी भाजपचे ७७ नगरसेवक होते. नगरसेवकांनी काम केल्याने प्रभाग रचना अनुकूल आहे. शंभर नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट आहे. ३२ प्रभागांचा दौरा सुरु असून सर्वेक्षणानुसार उमेदवारी दिली जाईल. स्वबळावर लढण्याची मागणी कायम असून अंतिम निर्णय वरिष्ठ घेतीलमागीलवेळी नैसर्गिक सीमा न पाळता केलेली प्रभाग रचना आताही कायम ठेवली आहे. त्यामुळे हरकती घेतल्या जाणार आहेत. हरकती कितपत ऐकल्या जातील याबाबत शंका आहे. जाहीर झालेल्या प्रभाग रचनेनुसार तयारी सुरू आहे. स्वबळावर लढण्याचीही तयारी आहे. युतीबाबतचा अंतिम निर्णय अजित पवार घेतील. फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीत चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभाग तयार करण्यात आले होते. या प्रभाग रचनेचा भाजपला फायदा झाला. ७७ नगरसेवकांसह महापालिकेवर पहिल्यांदाच भाजपचे कमळ फुलले.

# पुणे-नाशिक महामार्ग एलिव्हेटेड होणार

## दोन तासांचा प्रवास अवघ्या 20 मिनिटांवर

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नाशिक फाटा ते राजगुरुनगर (खेड) हा २८ कि.मी. लांबीचा पुणे-नाशिक महामार्ग उन्नत होणार आहे. त्यामुळे सध्या या दरम्यान प्रवासासाठी लागणारा दीड-दोन तासांचा कालावधी अवघ्या २० मिनिटांवर येणार आहे.**



त्याकरिता नाशिक फाटा ते राजगुरुनगर (एनएच-६०) या मार्गावरील उन्नत मार्गिकेच्या प्रवेशमार्गासाठी (एलिव्हेटेड कॉरिडॉर ॲप्रोच रॅम्प) खेड तालुक्यातील नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, वाकी खुर्द, वाकी बुद्रुक, चिंबळी, कुरुळी आणि चाकण या गावांतील मोजणी करून भूसंपादन प्रक्रिया करण्यात येणार आहे.आली.

चाकण शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मेदनकरवाडी, कडाची वाडी, नाणेकरवाडी आणि खराबवाडी या गावांमधील जमिनींचे भूसंपादन करून पर्यायी बाह्य वळण रस्ते तयार करण्याचे नियोजन केले आहे.

पुणे महानगरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विविध यंत्रणांमार्फत उपाययोजनांवर भर दिला जात आहे. यात प्रामुख्याने प्रस्तावित रस्ते रुंदीकरणाच्या अनुषंगाने तातडीने मोजणी करून भूसंपादन प्रक्रिया राबवण्याचा आदेश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिला. मुळशी तालुक्यातील बालेवाडी ते शेडगेवस्ती, सूर्या हॉस्पिटल ते ठाकर वस्ती आणि नांदे-माण यांसह इतर मार्गावरील भूसंपादन प्रस्तावांचा आढावा या वेळी घेण्यात आला. नवले पूल भागात वाहतूक सुरळीत करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. वर्तुळाकार रस्ता आणि राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक असलेल्या जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. त्यासंबंधी तातडीने मोजणी करून प्रस्ताव भूसंपादन जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्याची सूचना यावेळी करण्यात आली.

## वर्तुळाकार रस्त्याच्या भूसंपादनावर चर्चा

रिंग रोडच्या पहिल्या टप्प्यात नाशिक महामार्ग ते अहिल्यानगर रस्ता या दरम्यानच्या सोलू, सोलू इंटरचेंज, वडगाव शिंदे आणि निरगुडी या गावांमधील मोजणी पूर्ण झाली असून, भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. दुसऱ्या टप्प्यात अहिल्यानगर महामार्ग ते सोलापूर महामार्ग या मार्गावरील आंबेगाव खुर्द आणि भिलारेवाडीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे. तिसऱ्या टप्प्यात सोलापूर रस्ता ते सातारा रस्ता आणि चौथ्या टप्प्यात सातारा ते पौड रस्ता या मार्गावरील भूसंपादन प्रक्रियेवर चर्चा झाली. वर्तुळाकार रस्त्यासाठी टप्प्याटप्प्याने भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत असून, आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीचा आढावा महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला.

**प्रधानमंत्री आवास योजना** रावेत प्रकल्पासाठी प्रकिया सुरू

# 934 लाभार्थ्यांना घरे मिळणार!

## पहिल्या टप्प्यातील लाभार्थ्यांना किवळे येथे घरे; दुसऱ्या टप्प्यासाठी प्रक्रिया सुरू

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**रावेत परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) २ साठी प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे. पहिल्या टप्प्यातील ९३४ लाभार्थ्यांना घरे मिळाली नसल्याने निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला आहे. त्यांना किवळे येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) योजनेअंतर्गत घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.**




या योजनेसाठी दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. रावेत येथील प्रकल्पामध्ये ९२५ ते ९४८ सदनिकांच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची कार्यवाही चालू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असून सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबवली जाते. या योजनेच्या दोन्ही टप्प्यांमुळे रावेत परिसरातील शेकडो नागरिकांना घरकुलाचा दिलासा मिळण्याची आशा आहे.

**३२५ चौरस फूट घरे**

प्रधानमंत्री आवास योजना २ मध्ये ९२५ ते ९४८ घरांचे नियोजन असून प्रत्येकी ३२५ चौरस फुटांचे घर नागरिकांना देण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक त्या मान्यता मिळविण्याचे काम सुरू आहे. या योजनेसाठी शशी प्रभू ॲण्ड असोसिएशन यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्राथमिक स्तरावर विकसित आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून विविध मान्यता मिळाल्यानंतर पुढील टप्पा सुरू होणार आहे. रावेत परिसरातील नागरिक आणि पहिल्या टप्प्यातील लाभार्थ्यांमध्ये या घडामोडींनंतर समाधानाचे वातावरण आहे. न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रशासनिक विलंबामुळे आधीच वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागली आहे. त्यामुळे आता दुसऱ्या टप्प्याचे काम वेळेत पूर्ण होऊन लवकरात लवकर घरे उपलब्ध करून द्यावीत, असे लाभार्थ्यांची अपेक्षा आहे.

**न्यायालयीन स्थगिती मागे**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यात रावेत येथील आरक्षित जागेवर ९३४ घरांचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी कामाचे आदेश काढून काही प्रमाणात कामही सुरू झाले होते. स्थानिक शेतकऱ्यांनी योग्य मोबदला न मिळाल्याने उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यानंतर न्यायालयाने स्थगिती दिल्याने हा पहिला टप्पा ठप्प झाला होता. अलीकडेच महापालिका प्रशासनाने न्यायालयीन लढाईत यश मिळवत स्थगिती हटविली आहे. त्यामुळे या टप्प्यातील लाभार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

> पंतप्रधान आवास योजनेसाठी प्राथमिक स्तरावरची कामे सुरू आहेत. सर्व आवश्यक मान्यता घेऊन पुढील कामकाज सुरू होईल. चालू दर सूचीनुसार दर निश्चित केले जातील.
>
> **-अनघा पाठक,** कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री आवास योजना, रावेत - २

> पहिल्या टप्प्यातील ९३४ लाभार्थ्यांना किवळे येथे (ईडब्ल्यूएस) योजनेअंतर्गत घरे दिली जाणार आहेत. त्यासाठी दर १३ ते १४ लाखांच्या दरम्यान निश्चित केला जाईल. अनेक वर्षे प्रतीक्षेत असलेल्या लाभार्थ्यांना घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार आहे.
>
> **-अण्णा बोदडे,** उपायुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग

**रावेत पीएम आवास योजना – न्यायालयीन स्थगिती हटविली**

**९३४ लाभार्थ्यांना किवळे येथे घरे; दर १३-१४ लाखांच्या दरम्यान**

**दुसऱ्या टप्प्यासाठी ९२५ ते ९४८ घरांचे नियोजन**

**प्रत्येकी ३२५ चौरस फुटांचे घर देण्याची तयारी**

# आयटी अभियांत्रिकीचा झपाट्याने विकास - कांचन भोंडे

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड विद्यापीठात 'दीक्षारंभ' समारंभ

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयटी अभियांत्रिकीचा विकास झपाट्याने होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट बॉट, चॅट जीपीटी हे शब्द परवलीचे झाले असून तीन चार वर्षांत तंत्रज्ञान बदलत आहे. याचा विचार करून आपली कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. तरच भविष्यातील आव्हानांचा यशस्वीपणे सामोरे जाऊन यश संपादन करता येईल, असे मार्गदर्शन सोगिती कंपजेमिनीच्या वरिष्ठ संचालक कांचन भोंडे यांनी विद्यार्थ्यांना केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट पीसीईटी संचालित पिंपरी चिंचवड विद्यापीठ, साते मावळ येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी 'दीक्षारंभ' समारंभाचे आयोजन सोमवारी (२५ ऑगस्ट) करण्यात आले होते. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, धनंजय काळभोर, प्रभारी कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, स्कूल ऑफ इंजिनीअरिंग ॲंड टेक्नॉलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. रामदास बिरादार, अभियांत्रिकी विभाग अधिष्ठाता डॉ. विजय पाटील आदी उपस्थित होते. उच्च शिक्षण घेताना स्वयं शिक्षणावर भर दिला पाहिजे. जोपर्यंत तुम्ही स्वयं प्रेरणेने अभ्यास करत नाहीत; तोपर्यंत ज्ञानाच्या कक्षा रुंदावणार नाहीत; हे विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. पालकांनी देखील या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत, असे भोंडे यांनी सांगितले.

पीसीईटी शैक्षणिक समुहातील सर्व संस्था, पिंपरी चिंचवड विद्यापीठ विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे कार्य तीस - पस्तीस वर्षांपासून करत आहे. शिक्षक, प्राध्यापकांच्या योगदानामुळे संस्थेने ही प्रगती केली असून आंतरराष्ट्रीय पातळीवर पीसीईटीने दर्जेदार शिक्षण देणारी संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. विद्यार्थ्यांनी काटेकोर शिस्तीचे पालन करत मन लावून अभ्यास करावा. अभ्यासक्रमा सोबतच मानसिक, शारीरिक तंदुरुस्तीवर भर दिला पाहिजे. यासाठी विद्यापीठात क्रीडा विभाग कार्यरत असून विद्यार्थ्यांनी येथील सुविधांचा लाभ घेतला पाहिजे. पालकांनी पाल्याच्या प्रगतीबाबत प्राध्यापकांशी नियमित संवाद साधला पाहिजे, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले. डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. सुदीप थेपडे, डॉ. रामदास बिरादार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



**‘स्टेट’मेंन्ट**
राहुल जगताप

सर्व साधनांत श्रेष्ठ साधन नामस्मरणच आहे. पण त्याचे महत्त्व कळत नाही. ते कळायला खरोखर भगवत्कृपाच पाहिजे. आपल्या शरीरात मुख्य जसे हृदय, आणि बाकीचे अवयव गौण आहेत, तसे परमार्थात मुख्य साधन नामस्मरण हे आहे आणि दुसरी साधने गौण आहेत. नाम हे मंगलांत मंगल आणि अत्यंत पवित्र आहे. आपले जीवन देवाच्या हाती आहे, आणि देव नामाच्या स्वाधीन आहे हे पक्के लक्षात ठेवा. योगात, योग करीपर्यंतच समाधान असते; पण नामस्मरणाच्या अनुसंधानात सतत समाधान असते. स्वत: निर्गुण झाल्याशिवाय निर्गुण उपासना होत नाही. तेज दिसणे, नाद ऐकणे, या सर्व गोष्टी गुणातच नाही का आल्या ? निर्गुण व्हायला देहबुद्धी सुटायला पाहिजे. सर्वव्यापी परमेश्वराला सर्वांभूतीं पाहणे ही निर्गुण उपासनाच होय. योग नामस्मरणाला पोषक तितकाच करावा; केवळ त्यालाच प्राधान्य देऊ नये. योग नामस्मरणाला पोषक आहे, पण नामस्मरण योगाच्या पलीकडे आहे; म्हणून नामस्मरणात योग येतो, योगात नामस्मरण येत नाही. सर्व साधनांचा अंत नामस्मरणात आहे. नामाचे साधन हे जलद गाडीप्रमाणे आहे. रंग दिसणे, प्रकाश दिसणे, आवाज ऐकू येणे ही मधली स्टेशने सोडून नाम एकदम भगवंतापर्यंत नेऊन पोहोचवते. इतर साधनांनी लवकर साधल्यासारखे वाटेल, पण ते तात्पुरते असते. नामाने थोडा उशीर लागेल, पण जे साधेल ते कायमचे साधेल, कारण नामाने मुळापासून सुधारणा होते. नामस्मरण हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग होय. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही. नामाच्या आनंदाचा झटका आला की मनुष्य स्वत:ला विसरेल. तुकारामबुवांची वाचा त्यांना अनावर झाली, ती सारखी नाम घेऊ लागली; याचा अर्थ असा की, त्यांच्या कल्पनेच्या बाहेर नाम येऊ लागले. गाडी उताराला लागली की जशी अतिवेगात येते आणि आवरत नाही, तसे हे आहे. आपल्या शक्तीच्या बाहेर कार्य होणे ही भगवंताची कृपा होय.

चार माणसे होती, त्या सर्वांना एकच रोग झाला होता. पण त्यांची सांपत्तिक स्थिती सारखी नव्हती. वैद्याने त्यांपैकी अगदी गरीब माणसाला एक औषध तुळशीच्या रसात घ्यायला सांगितले, त्याच्यापेक्षा पैसेवाल्याला तेच औषध मधात घ्यायला सांगितले, त्याच्याहीपेक्षा पैसेवाल्याला तेच औषध केशरात घ्यायला सांगितले, आणि सर्वांत श्रीमंत होता त्याला तेच औषध कस्तुरीत घ्यायला सांगितले. त्याचप्रमाणे, ज्याचा जसा अधिकार तसे त्याने नाम घ्यावे. नाम नुसते तोंडाने घ्यावे, नाम श्रद्धेने घ्यावे, नाम वृत्ती सांभाळून घ्यावे, नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही, अशा दृढ भावनेने घ्यावे; सर्वांना फळ सारखेच मिळेल.

# प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष”



**‘स्टेट’मेंट**
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात अलीकडे घडलेल्या बदलांमुळे तरुण नेते रोहित पवार पुन्हा चर्चेत आले आहेत. जयंत पाटील यांना प्रदेशाध्यक्षपदावरून दूर करून शशिकांत शिंदे यांची नियुक्ती झाली, पण संघटनात्मक कामकाजात आणि निर्णय प्रक्रियेत रोहित पवार यांचा ठसा अधिक ठळकपणे उमटला आहे. त्यामुळेच त्यांच्यावर “प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष” अशी टीका विरोधकांकडून केली जात आहे.**



प्रवक्त्यांच्या व फ्रंटल सेल्सच्या नियुक्त्यांमध्ये, आंदोलनांमध्ये सहभाग, थेट अधिकाऱ्यांना भेटी, सोशल मीडियावरील आक्रमक पवित्रा अशा विविध माध्यमांतून रोहित पवार यांनी स्वतःची उपस्थिती ठळक केली आहे. यामुळे युवक कार्यकर्त्यांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढली आहे, तर ज्येष्ठ नेत्यांमध्ये अस्वस्थता आहे. प्रश्न असा आहे की ही वाढती सक्रियता पक्षाला नवे बळ देईल की गटबाजीला खतपाणी घालेल? औपचारिक अध्यक्ष शशिकांत शिंदे असले तरी कार्यकर्त्यांच्या नजरेत पक्षाचा चेहरा रोहित पवार ठरत आहेत. पुढील निवडणुकांमध्ये ते पक्षासाठी ‘तरुणाईचे नवे नेतृत्व’ ठरतील की ‘सुपर बॉस’ प्रतिमेत अडकतील, हे काळच सांगेल.महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार गट) हा नेहमीच चर्चेचा विषय ठरला आहे. गेल्या काही महिन्यांत या पक्षात घडलेल्या बदलांनी राज्याच्या राजकीय समीकरणांना वेगळे वळण दिले आहे. विशेषतः जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपद सोडल्यानंतर, त्यांच्या जागी शशिकांत शिंदे यांची नियुक्ती झाल्यानंतर, पक्षात एक नवीन शक्ती उदयास आली आहे – आमदार रोहित पवार. शिंदे हे औपचारिक प्रदेशाध्यक्ष असले तरी संघटनात्मक कामकाज, पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका, आंदोलनं व बैठका या सर्वच स्तरांवर रोहित पवार यांचा प्रभाव ठळकपणे दिसत आहे. त्यामुळेच विरोधी गटाकडून त्यांच्यावर “प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष” अशी टीका केली जात आहे.

### जयंत पाटील युगाची सांगता आणि नवीन नेतृत्वाचा उदय

जयंत पाटील यांच्या कार्यकाळात रोहित पवार यांना संघटनेत फारशी भूमिका नव्हती. त्यांच्या आणि पाटील यांच्यातील “कोल्ड वॉर” अनेकदा चर्चेत आली होती. पाटील यांचे वर्चस्व असल्याने रोहित पवार यांना मोठ्या जबाबदाऱ्या मिळत नव्हत्या. पण परिस्थिती बदलली. शशिकांत शिंदे यांच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्तीनंतर रोहित पवार यांची संघटनेतील सक्रियता वाढली. त्यांनी प्रवक्त्यांची नियुक्ती स्वतःच्या पसंतीने केली. फ्रंटल सेल्समध्ये त्यांच्या निकटवर्तीयांची नियुक्ती झाली. महत्त्वाच्या बैठकींमध्ये ते स्वतःहून पुढाकार घेताना दिसले. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये ही भावना पक्की झाली की पक्षाच्या संघटनात्मक कामावर प्रत्यक्ष नियंत्रण रोहित पवार यांचेच आहे.

### टीकेचे सावट आणि राजकीय संदेश

अजित पवार गटाचे सूरज चव्हाण यांनी रोहित पवार यांच्यावर टीका करताना म्हटले – “सरचिटणीस असूनही ते अध्यक्षासारखे वागत आहेत. त्यांना पदाचा फरक समजत नाही. प्रत्यक्षात ते प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष झाले आहेत.” ही टीका फक्त विरोधकांनी केलेली नाही, तर पक्षाच्या आतल्या गोटातही कुजबुज सुरू आहे. तरीही रोहित पवार यांनी या टीकेला उत्तरे दिली – “आमचे अध्यक्ष पक्षाची नवी बांधणी करत आहेत. आम्ही त्यांनी सांगितल्याप्रमाणेच काम करतो.” परंतु वास्तव हे आहे की कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या नजरेत आज पक्षाचा चेहरा रोहित पवार ठरत आहेत.

### जनतेमध्ये सक्रिय उपस्थिती

रोहित पवार यांचा प्रभाव केवळ संघटनापुरता मर्यादित नाही. त्यांनी प्रत्यक्ष लोकसंपर्क आणि आंदोलनांमधून स्वतःची प्रतिमा दृढ केली आहे. मुंबई पाण्याखाली गेली तेव्हा त्यांनी सखल भागांची पाहणी केली. कबुतरखाना प्रकरणात आंदोलनस्थळी ते हजर राहिले. गणेशोत्सवातील समस्यांसाठी त्यांनी थेट मुंबई महापालिका आयुक्तांना भेट घेतली. मंत्री माणिकराव ठाकरे यांचा रमी खेळतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करून त्यांनी चर्चेचा विषय निर्माण केला. सिडको अध्यक्ष संजय शिरसाठ यांच्यावर ५ हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप करून त्यांनी नवी मुंबईत मोर्चा काढला. या सर्व कृतींमुळे रोहित पवार हे आक्रमक, सजग आणि जनतेशी थेट जोडलेले तरुण नेते म्हणून उभे राहिले आहेत.

### तरुण नेतृत्व विरुद्ध ज्येष्ठ नेते

राजकीय संघटनांमध्ये सतत एक संघर्ष चालू असतो – ज्येष्ठ नेतृत्वाचे अनुभव आणि तरुण नेतृत्वाची उर्मी. राष्ट्रवादी (शरद पवार गट) यातही हेच चित्र दिसत आहे. एकीकडे अजूनही पक्षाचे ज्येष्ठ नेते संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे रोहित पवार यांसारखे तरुण नेते स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करण्यासाठी आक्रमक भूमिका घेत आहेत. या संघर्षातून पक्षाला नवा चेहरा मिळेल का, की गटबाजीचे बीज रोवले जाईल – हा प्रश्न आता सर्वांना पडला आहे.

### रोहित पवार यांच्या शैलीचे वेगळेपण

त्यांच्या नेतृत्वशैलीत काही वैशिष्ट्ये आहेत : आक्रमक आणि धाडसी: थेट आरोप करण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत. जनतेशी संपर्क: समस्याग्रस्त भागात जाणे, आंदोलने, प्रत्यक्ष भेटी. सोशल मीडिया वापर: टीकात्मक पोस्ट्स व व्हिडिओद्वारे जनमत घडवणे. तरुणाईशी नाळ: तरुण कार्यकर्ते व मतदार यांच्यात त्यांची प्रतिमा सकारात्मक आहे. ही शैली पारंपरिक राजकारणापेक्षा वेगळी आहे. ज्येष्ठ नेत्यांचा संयम आणि सावधगिरी यापेक्षा रोहित पवार यांची झपाट्याने पुढे जाण्याची वृत्ती त्यांना ठळकपणे वेगळे दर्शवते.

### राजकीय समीकरणांवर परिणाम

रोहित पवार यांची वाढती सक्रियता पुढील काही परिणाम घडवू शकते : गटबाजीचा धोका: ज्येष्ठ नेत्यांना मागे टाकण्याची प्रवृत्ती अस्वस्थता निर्माण करू शकते. तरुणाईचा चेहरा: युवक कार्यकर्त्यांमध्ये त्यांची लोकप्रियता प्रचंड आहे. सुपर बॉस प्रतिमा: औपचारिक अध्यक्ष वेगळे असले तरी प्रत्यक्षात सर्वकाही त्यांच्या भोवती फिरते. विरोधकांवर प्रहार: अजित पवार गटाविरुद्ध सतत हल्लाबोल करून त्यांनी स्वतःचे राजकीय स्थान मजबूत केले आहे.

### शरद पवार यांचा वारसा आणि रोहित पवार यांचा प्रवास

शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अपराजेय व्यक्तिमत्त्व मानले जाते. त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षात आज नवीन चेहऱ्यांची उभारणी गरजेची आहे. अशा वेळी रोहित पवार हे पुढे सरसावले आहेत. त्यांना “प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष” म्हटले जात असले तरी, ही प्रतिमा केवळ टीकेपुरती मर्यादित नाही. उलट, ती त्यांच्या वाढत्या राजकीय वजनाची साक्ष देणारी आहे. रोहित पवार यांची वाढती सक्रियता पक्षाला एकजूट देईल का? की यामुळे गटबाजी वाढेल आणि ज्येष्ठ-तरुण संघर्ष अधिक तीव्र होईल? पक्षाचे औपचारिक नेतृत्व शशिकांत शिंदे यांच्याकडे राहील की प्रत्यक्षात कार्यकर्त्यांच्या मनावर रोहित पवारच राज्य करतील? पुढील विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत रोहित पवार यांचा प्रभाव किती निर्णायक ठरेल? राजकारणात पद महत्वाचे असते, पण प्रभाव त्याहूनही मोठा असतो. आज शशिकांत शिंदे हे औपचारिक अध्यक्ष आहेत; मात्र कार्यकर्त्यांच्या, जनतेच्या आणि विरोधकांच्या नजरेत पक्षाचा खरा चेहरा रोहित पवार ठरत आहेत. त्यांची वाढती सक्रियता ही पक्षासाठी ताकदीची बाब ठरू शकते, पण त्याचबरोबर गटबाजीचे सावटही निर्माण करू शकते. ते “प्रदेशाध्यक्षांचे प्रदेशाध्यक्ष” ठरतील की खऱ्या अर्थाने तरुणाईचे नेतृत्व करणारे नवे चेहरा म्हणून उभे राहतील — याचे उत्तर येणारे काही महिने आणि आगामी निवडणुका देतील.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक ः MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक ः वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक ः सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मूर्ख बनवू नका

## जरांगेंना उद्देशून केलेली आंबेडकरांची पोस्ट चर्चेत

# गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे हे त्यांच्या आरक्षणाच्या मागणीसाठी येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणासा बसणार आहेत. यापूर्वी मनोज जरांगे यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासह अन्य मागण्या मान्य झाल्या नाही, तर आपण राज्यातील सरकारसुध्दा उलथून टाकू शकतो, असा इशारा जरांगे-पाटील यांनी सोमवारी दिला. यादरम्यान वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी जरांगेंच्या आंदोलनाबद्दल भाष्य करत गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका असे म्हटले आहे.**

## मराठ्यांसाठी आंदोलन करत आहात पण



प्रकाश आंबेडकरांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकारच्या विरोधात लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना काही प्रश्न विचारले आहेत. “मनोज जरांगे पाटील, तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे? आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत,” असे प्रकाश आंबेडकर त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. इतकेच नाहीतर अडीच वर्षापूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असताना देखील अनेक प्रस्थापित मराठा सत्तेत होते होते. ज्यामध्ये शरद पवार, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात यांचा समावेश होता असेही प्रकाश आंबेडकरांनी नमूद केले आहे.तुम्ही निवडणुकीत या श्रीमंत मराठ्यांचा प्रचार केला आणि त्यांना मतदान केले.

तुम्ही गरीब मराठ्यांसाठी आंदोलन करत आहात पण, गरीब मराठ्यांना वंचित ठेवणाऱ्या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका,” असे अवाहन प्रकाश आंबेडकरांनी केले आहे.लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुम्ही श्रीमंत मराठ्यांना पाठिंबा दिला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा तीच भूमिका घ्याल आणि गरीब मराठ्यांना मूर्ख बनवाल का?” असा सवालही आंबेडकरांनी या पोस्टच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांना विचारला आहे.

अंतरवाली सराटी येथे सोमवारी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना जरांगे यांनी माहिती दिली की, २७ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता अंतरवाली सराटी येथून शहागड, पैठण, शेवगाव, पांढरी पूल, आळेफाटा मार्गे मराठा समाज शिवनेरी गडावर मुक्कामासाठी पोहोचेल. तर दुसऱ्या दिवशी चाकण, लोणावळा, वाशी, चेंबूरमार्गे रात्री मुंबईत आझाद मैदानावर पोहोचेल. २९ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता उपोषणास सुरुवात होईल.

आंदोलनाच्या ठिकाणी कीर्तन, भजन आणि शाहिरांच्या पोवाड्यांचे कार्यक्रम होतील. प्रकाश आंबेडकरांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकारच्या विरोधात लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना काही प्रश्न विचारले आहेत. “मनोज जरांगे पाटील, तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे? आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत,” असे प्रकाश आंबेडकर त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. इतकेच नाहीतर अडीच वर्षापूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असताना देखील अनेक प्रस्थापित मराठा सत्तेत होते होते. ज्यामध्ये शरद पवार, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात यांचा समावेश होता असेही प्रकाश आंबेडकरांनी नमूद केले आहे.तुम्ही निवडणुकीत या श्रीमंत मराठ्यांचा प्रचार केला आणि त्यांना मतदान केले.

## सरकारमध्ये कोण आहे?

गरीब मराठ्यांना वंचित ठेवणाऱ्या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका,” असे अवाहन प्रकाश आंबेडकरांनी केले आहे.लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुम्ही श्रीमंत मराठ्यांना पाठिंबा दिला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा तीच भूमिका घ्याल आणि गरीब मराठ्यांना मूर्ख बनवाल का?

## ‘कलम ३२’अंतर्गत मृत्युदंडास आव्हान शक्य

# फाशीला स्थगिती देताना सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चार वर्षांच्या बालिकेवर बलात्कार व खून केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या नागपूरच्या वसंत दुपारे या आरोपीला सुनावण्यात आलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. तसेच या प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.**



हा निकाल देताना, संविधानाच्या कलम ३२अंतर्गत प्रक्रियेत त्रुटी आढळल्यास मृत्युदंडाच्या प्रकरणांमध्ये पुन्हा सुनावणी घेतली जाऊ शकते, असे न्या. विक्रम नाथ, न्या. संजय करोल व न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.सर्वोच्च न्यायालयाने दुपारेची दोषसिद्धी कायम ठेवत त्याच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. शिक्षेबाबतचा निर्णय आता सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाद्वारा घेतला जाईलनागपूर सत्र न्यायालयाने मृ त्याविरोधात त्याने केलेले अपील आधी उच्च न्यायालयाने आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले. पुनर्विलोकन याचिकाही २०१७ फेटाळण्यात आली. राज्यपाल आणि राष्ट्रपती यांनी आरोपीची दया याचिका अनुक्रमे २०२२ व २०२३मध्ये नाकारली. त्यानंतर ‘एनएलएसएआर’ विद्यापीठाच्या ‘स्क्वेअर सर्कल क्लिनिक’च्या कायदेशीर मदतीने दुपारेने कलम ३२अंतर्गत याचिका दाखल केली होती.आरोपीच्या वतीने ज्येष्ठ अधिवक्ता गोपाल शंकरनारायणन यांनी शिक्षेच्या सुनावणीवेळी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले नाही, असा युक्तिवाद केला तर महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी यावर तीव्र आक्षेप नोंदवत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर केवळ ‘क्युरेटिव्ह’ याचिकाच दाखल करता येते.

## कलम ३२अंतर्गत प्रक्रियेत त्रुटी

परिस्थितीत कलम ३२ अंतर्गत हस्तक्षेप करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे, असा निष्कर्ष काढला आणि शिक्षेला स्थगिती दिली.कलम ३२ हे संविधानिक उपचारांचे आधारस्तंभ आहे. मात्र, प्रत्येक प्रकरणासाठी हा मार्ग खुला करता येणार नाही. केवळ प्रक्रियात्मक नियमांचे ठोस उल्लंघन झालेल्या प्रकरणांतच ही सुधारात्मक शक्ती वापरली जाईल.

## विरोधकांवर टीका


## अमित शहांकडून घटनादुरुस्ती विधेयकाचे समर्थन

# तुरुंगातून देश चालवायचा का?

## विरोधकांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**"पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा अन्य कोणताही नेता तुरुंगातून देशाचा कारभार चालवू शकतात का," असा प्रश्न विचारत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी १३०व्या घटनादुरुस्ती विधेयकाचे समर्थन केले. शहा यांनी सोमवारी 'एएनआय'ला दिलेल्या मुलाखतीत नैतिकतेच्या मुद्द्यावरून विरोधकांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.**



पाच किंवा त्यापेक्षा जास्त काळ तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद असलेल्या, गंभीर आरोपांवरून ३० दिवसांपेक्षा जास्त काळ तुरुंगात असलेले पंतप्रधान, मुख्यमंत्री, केंद्रीय आणि राज्यातील मंत्री यांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेल्या राज्यघटना (१३०वी सुधारणा) विधेयकाला विरोधकांनी जोरदार विरोध केला आहे. मात्र, या घटनादुरुस्ती विधेयकाला काँग्रेससह विरोधी पक्षातील अनेकजण पाठिंबा देतील असा विश्वास अमित शहा यांनी व्यक्त केला. घटनात्मक नैतिकता आणि जनतेचा विश्वासाला आधार देणे हा विधेयकाचा हेतू असल्याचे शहा म्हणाले. विधेयकामध्ये पंतप्रधानपदाचा समावेश खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच केला असल्याची माहितीही त्यांनी दिली. सध्या हे विधेयक छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले आहे. या समितीमध्ये लोकसभा आणि राज्यसभेचे मिळून ३१ सदस्य आहेत.सोहराबुद्दीन शेख बनावट चकमक प्रकरणात सीबीआयने समन्स बजावल्यानंतर आपण दुसऱ्याच दिवशी राजीनामा दिला. या खटल्यातून आपली निर्दोष सुटका होईपर्यंत आपण कोणत्याही पदावर नव्हतो, अशी आठवण अमित शहा यांनी करून दिली. राजदचे नेते लालूप्रसाद यादव यांना दिलासा देण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग यांनी अध्यादेश आणला होता, तो तेव्हा राहुल गांधी यांनी फाडला होता. राहुल यांची ती नैतिकता कुठे गेली असा प्रश्नही शहा यांनी विचारला.अरविंद केजरीवाल यांच्यासंबंधीचा खटला सुरू असताना, ते तुरुंगात असल्यामुळे त्यांनी नैतिकतेच्या कारणावरून राजीनामा द्यावा असे मत उच्च न्यायालयाने व्यक्त केले होते. पण घटनेत तशी तरतूद नव्हती," असे म्हणत शहा यांनी दिल्लीच्या माजी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले. त्यावर, "आपल्या पक्षामध्ये भ्रष्ट नेत्यांना प्रवेश देणाऱ्यांनीही राजीनामा द्यायला हवा का," असा प्रतिप्रश्न करत केजरीवाल यांनी शहा यांना प्रत्युत्तर दिले.मला संपूर्ण देश आणि विरोधकांना विचारायचे आहे, एक मुख्यमंत्री, पंतप्रधान किंवा अन्य कोणताही नेता तुरुंगातून देश चालवू शकतो का? हे आपल्या लोकशाहीच्या प्रतिष्ठेला धरून आहे का? आजही त्यांचा प्रयत्न असा आहे की, ते तुरुंगात गेले तरी त्यांना तुरुंगातूनही सहज सरकार स्थापन करता येईल. जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणावरूनच राजीनामा दिला आहे, त्यावरून अनावश्यक चर्चा करण्याची गरज नाही अशा शब्दांमध्ये अमित शहा यांनी विरोधकांचा दावा फेटाळून लावला. धनखड यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे, असा विरोधकांचा आरोप आहे. तसेच ते सध्या कुठे आहेत, हे कोणालाच माहीत नाही अशी विचारणा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली होती. पाच किंवा त्यापेक्षा जास्त काळ तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद असलेल्या, गंभीर आरोपांवरून ३० दिवसांपेक्षा जास्त काळ तुरुंगात असलेले पंतप्रधान, मुख्यमंत्री, केंद्रीय आणि राज्यातील मंत्री यांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेल्या राज्यघटना (१३०वी सुधारणा) विधेयकाला विरोधकांनी जोरदार विरोध केला आहे.

### घटनादुरुस्ती विधेयकाचे समर्थन

मात्र, या घटनादुरुस्ती विधेयकाला काँग्रेससह विरोधी पक्षातील अनेकजण पाठिंबा देतील असा विश्वास अमित शहा यांनी व्यक्त केला. घटनात्मक नैतिकता आणि जनतेचा विश्वासाला आधार देणे हा विधेयकाचा हेतू असल्याचे शहा म्हणाले. विधेयकामध्ये पंतप्रधानपदाचा समावेश खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच केला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# दुकानांच्या बाहेर 'स्वदेशी' बोर्ड लावा!

## अमेरिकेच्या टॅरिफच्या पार्श्वभूमीवर मोदींचे व्यापाऱ्यांना आवाहन

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापारी संबंध ताणले गेले आहेत. यादरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा नागरिकांनी स्वदेशी मालाचा वापर करावा असे अवाहन केले आहे. इतकेच नाही तर मोदींनी दुकानदार आणि व्यापाऱ्यांना देखील स्वदेशी मालाबद्दल विशेष अवाहन केले आहे.**



येत्या काही दिवसात ओळीने येणाऱ्या सणांच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये खरेदी मोठ्या प्रमाणात वाढते. यात पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यावसायिकांनी त्यांच्या दुकानांच्या बाहेर येथे फक्त 'स्वदेशी' वस्तू विकल्या जातात असे बोर्ड लावावेत असे अवाहन केले आहे. पंतप्रधान मोदी हे गुजरातमधील अहमदाबाद येथे एका कार्यक्रमात बोलत होते."हा सणासुदीचा काळ आहे, आता नवरात्र, विजय दशमी (दसरा), धनतेरस, दिवाळी, हे सर्व सण येत आहेत.

हे आपल्या संस्कृतीचे उत्सव तर आहेतच, तसेच हे आत्मनिर्भरतेचे उत्सव देखील असले पाहिजेत. म्हणूनच, मी तुम्हाला पुन्हा एकदा आग्रह करू इच्छितो की आपण आपल्या जीवनात एक मंत्र स्वीकारला पाहिजे की, आपण जे काही खरेदी करू ते 'मेड इन इंडिया', स्वदेशी असेल," असे पंतप्रधान मोदी म्हणाले.मी दुकानदार आणि व्यापाऱ्यांना सांगू इच्छितो की, देशाला पुढे घेऊन जाण्यात तुम्ही खूप मोठे योगदान देऊ शकता, तुम्ही ठरवून घ्या की विदेशी माल विकणार नाही. आणि मोठ्या अभिमानाने बोर्ड लावा की माझ्याकडे स्वदेशी माल विकला जातो," असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

### स्वदेशी मालाचा वापर करावा

आपल्या या लहान-लहान प्रयत्नांनी हे उत्सव भारताच्या समृद्धीचे मोहोत्सव बनतील, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी बोलताना म्हणाले.गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापारी संबंध ताणले गेले आहेत. यादरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा नागरिकांनी स्वदेशी मालाचा वापर करावा असे अवाहन केले आहे.

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥धृ०॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥
हिरेजडीत मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥२॥
॥ जय देव जय देव०॥

माथा मुकुट मणी कानी कुंडले ।
सोंड दोंदावरी शेंदुर चर्चिले ।।
नागबंद सोंड-दोंद मिराविले ।
विश्वरूप तया मोरयाचे देखिले ॥३॥
॥ जय देव जय देव०॥

चतुर्भुज गणराज बाही बाहुटे ।
खाजयाचे लाडू करुनी गोमटे ।।
सुवर्णाचे ताटी शर्करा घृत ।
अर्पी तो गणराज विघ्ने वारीतो ॥४॥
॥ जय देव जय देव०॥

छत्रे चामरे तुजला मिरविती ।
उंदीराचे वाहन तुजला गणपती ।।
ऐसा तु कलीयुगी सकळीक पाहसी ।
आनंदे भक्तासी प्रसन्न होसी ॥५॥
॥ जय देव जय देव०॥

ता ता धि मि किट धि मि किट नाचे गणपती ।
ईश्वर पार्वती कौतुक पाहती ।।
ताल मृदंग वीणा घोर उमटती ।
त्यांचे छंदे करुनी नाचे गणपती ॥६॥
॥ जय देव जय देव०॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटीं पावावें निर्वाणीं
रक्षावें सुरवर वंदना ॥ ७ ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥
जय देव जय देव०॥

# शेंदुर लाल चढ़ायो आरती

शेंदुर लाल चढ़ायो अच्छा गजमुखको।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरिहरको।
हाथ लिए गुडलद्दु सांई सुरवरको।
महिमा कहे न जाय लागत हूं पादको ॥1॥

जय जय श्री गणराज विद्या सुखदाता
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता,
जय देव जय देव ॥धृ०॥

अष्टौ सिद्धि दासी संकटको बैरि ।
विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐबी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारि ॥2॥

॥ जय देव जय देव०॥

भावभगत से कोई शरणागत आवे ।
संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ॥3॥

॥ जय देव जय देव०॥



# गणेश चतुर्थी आरती संग्रह

# जय गणेश जय गणेश देवा आरती

जय गणेश, जय गणेश, जय गणेश देवा।
माता जाकी पार्वती, पिता महादेवा ॥

एकदंत, दयावन्त, चार भुजाधारी,
माथे सिन्दूर सोहे, मूस की सवारी ।
पान चढ़े, फूल चढ़े और चढ़े मेवा,
लड्डुअन का भोग लगे, सन्त करें सेवा ॥

जय गणेश, जय गणेश,
जय गणेश, देवा ।
माता जाकी पार्वती,
पिता महादेवा ॥

अंधन को आंख देत,
कोढ़िन को काया,
बांझन को पुत्र देत,
निर्धन को माया।
'सूर' श्याम शरण आए,
सफल कीजे सेवा ॥

जय गणेश जय गणेश
जय गणेश देवा ।
माता जाकी पार्वती,
पिता महादेवा ॥

दीनन की लाज रखो,
शंभु सुतकारी।
कामना को पूर्ण करो
जय बलिहारी।

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।
त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुः सखा त्वमेव ।

त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।

अच्युतं केशवं राम नारायणम्
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम्
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

लाडका हिटमॅन

## रोहितचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

# चाहत्यांचा लाडका हिटमॅन!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या वनडे संघाच्या कर्णधार रोहित शर्मा हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात लोकप्रिय क्रिकेटपटूंपैकी एक आहे. सध्या क्रिकेटच्या मैदानापासून दूर असलेला रोहित मिळालेल्या सुट्टीचा आनंद घेताना दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी त्याने लंडनमध्ये भारत- इंग्लंड कसोटी सामना पाहण्यासाठी हजेरी लावली होती. त्यानंतर तो मुंबईतील रस्त्यावर आपली नवी कोरी लॅम्बॉर्गिनी कार चालवताना दिसून आला होता. आता एक व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होऊ लागला आहे, ज्यात तो एका फॅनला ऑटोग्राफ देताना दिसून येत आहे.**

## कार थांबवून फॅनसोबत फोटो काढला



व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, रोहित शर्मा आपली नवीकोरी लॅम्बॉर्गिनी घेऊन बाहेर फेरफटका मारण्यासाठी जाताना दिसून येत आहे. त्यावेळी त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती. यादरम्यान रोहितची नजर एक फॅनवर पडली. या फॅनने आपल्या हाताने रोहितचे सुंदर चित्र रेखाटले होते. ही फॅन रोहितला हे चित्र भेट म्हणून देण्यासाठी आली होती. दरम्यान रोहितने तिला पाहिलं, कार थांबवली आणि तिला भेटण्यासाठी बोलवलं. भेटल्यानंतर रोहितने या चित्रावर ऑटोग्राफ दिला आणि एक सुंदर मेसेजही लिहीला. आपल्या आवडत्या खेळाडूने स्वत: बोलवून ऑटोग्राफ देणं, याहून सुंदर आणखी काय असू शकतं. त्यानंतर रोहितने हे सुंदर चित्र हातात घेऊन फॅन आणि कुटुंबासह फोटो देखील काढला.रोहित शर्मा आयपीएल २०२५ स्पर्धेनंतर एकही सामना खेळण्यासाठी मैदानात उतरलेला नाही. रोहितने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत भारतीय संघाला चॅम्पियन बनवलं होतं.

या स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता. मात्र, या सामन्यानंतर त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यानंतर इंग्लंड दौऱ्याआधी त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर स्टोरी शेअर करून कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यामुळे तो केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. टी-२० आणि कसोटी क्रिकेटला रामराम केल्यानंतर आता रोहित वनडे क्रिकेटलाही रामराम करू शकतो, अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे. भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिका

### एका फॅनला ऑटोग्राफ

इंग्लंड दौऱ्याआधी त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर स्टोरी शेअर करून कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यामुळे तो केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. रोहित वनडे क्रिकेटलाही रामराम करू शकतो, अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे. भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे.

खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. या मालिकेत रोहित भारतीय संघाकडून खेळताना दिसू शकतो. पण वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेला अजून बराच वेळ शिल्लक आहे. त्यामुळे रोहित शर्मा २०२७ पर्यंत संघात टिकून राहणार का? हे पाहणं देखील तितकंच महत्वाचं राहणार आहे.व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, रोहित शर्मा आपली नवीकोरी लॅम्बॉर्गिनी घेऊन बाहेर फेरफटका मारण्यासाठी जाताना दिसून येत आहे. त्यावेळी त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती. यादरम्यान रोहितची नजर एक फॅनवर पडली. या फॅनने आपल्या हाताने रोहितचे सुंदर चित्र रेखाटले होते. ही फॅन रोहितला हे चित्र भेट म्हणून देण्यासाठी आली होती. दरम्यान रोहितने तिला पाहिलं, कार थांबवली आणि तिला भेटण्यासाठी बोलवलं. भेटल्यानंतर रोहितने या चित्रावर ऑटोग्राफ दिला आणि एक सुंदर मेसेजही लिहीला. आपल्या आवडत्या खेळाडूने स्वत: बोलवून ऑटोग्राफ देणं, याहून सुंदर आणखी काय असू शकतं. त्यानंतर रोहितने हे सुंदर चित्र हातात घेऊन फॅन आणि कुटुंबासह फोटो देखील काढला.रोहित शर्मा आयपीएल २०२५ स्पर्धेनंतर एकही सामना खेळण्यासाठी मैदानात उतरलेला नाही. रोहितने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत भारतीय संघाला चॅम्पियन बनवलं होतं. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता. मात्र, या सामन्यानंतर त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती.

# शाकिब बनला जगातील नंबर १ खेळाडू!

## शाकिबने टी-20 क्रिकेटमधील मोठा विक्रम आपल्या नावावर केला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशचा अनुभवी खेळाडू शाकिब अल हसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. पण अजूनही जगभरातील टी-२० लीग स्पर्धांमध्ये त्याच्या अष्टपैलू कामगिरीचा बोलबाला पाहायला मिळतो. सध्या तो वेस्टइंडिजमध्ये सुरू असलेली कॅरेबियन प्रीमियर लीग स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे.**



या स्पर्धेतील ११ व्या सामन्यात खेळताना त्याने बारबुडा संघाकडून गोलंदाजी करताना ३ गडी बाद केले. यासह त्याने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.या स्पर्धेतील ११ वा सामना सेंट किट्स अँड नेव्हिस पेट्रियट्स आणि बारबुडा या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात गोलंदाजी करताना त्याने नवीन बिदेसी, काइल मेयर आणि मोहम्मद रिझवान यांना बाद करत माघारी धाडलं. हे ३ गडी बाद करताच त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे. यासह तो टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करणारा आणि फलंदाजीत ७००० धावांचा पल्ला गाठणारा

### ४५७ सामन्यांमध्ये ७५७४ धाव

शाकिबने टी-२० क्रिकेटमधील ४५७ सामन्यांमध्ये ७५७४ धाव केल्या आहेत. या विक्रमात ड्वेन ब्राव्हो सुनील गावसकर देखील शाकिब अल हसनच्या जवळ पोहोचले आहेत.या स्पर्धेतील ११ व्या सामन्यात खेळताना त्याने बारबुडा संघाकडून गोलंदाजी करताना ३ गडी बाद केले. यासह त्याने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

पहिलाच क्रिकेटपटू ठरला आहे. या सामन्यात गोलंदाजीला येण्यापूर्वी शाकिबच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये ४९९ गडी बाद करण्याची नोंद होती. या सामन्यात गोलंदाजी करताना १ गडी बाद करताच त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करण्याचा पल्ला गाठला.टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करणारा तो बांगलादेशचा पहिलाच गोलंदाज ठरला आहे. तर जगातील पाचवा गोलंदाज ठरला आहे.यासह शाकिब अल हसन हा टी-२० क्रिकेटमध्ये गोलंदाजी करताना ५०० गडी बाद करणारा आणि फलंदाजी करताना ७००० धावांचा पल्ला गाठणारापहिलाच गोलंदाज देखील ठरला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। मंगळवार ।
। दि. 26 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# राष्ट्रवादीचा 'वसंत' बहरणार की भाजपा पुन्हा रा'हुल' देणार?

## ग्राऊंड रिपोर्ट: प्रभाग क्रमांक 2 मध्ये भाजपा- राष्ट्रवादीची "काँटे की टक्कर"

। पिंपरी चिंचवड । अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने "महाईन्यूज" च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला "ग्राऊंड रिपोर्ट" प्रसिद्ध करीत आहोत.**






"आमदार महेश लांडगे यांच्यामुळे मोशीसह भोसरी विधानसभा मतदार संघात मोठ्याप्रमाणात विकासकामे झाली आहेत. समाविष्ट गावांना खऱ्या अर्थाने त्यांच्यामुळे न्याय मिळाला. त्यामुळे चिखली, मोशी-चऱ्होलीकरांसह पिंपरी-चिंचवडकर भाजपाच्या पाठिशी राहतील.

**-राहुल जाधव,** माजी महापौर.



"उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे प्रभागात चांगली विकासकामे झाली आहेत. भाजपावर लोकांची नाराजी आहे. पक्षाची ताकद 'स्ट्रॉंग' आहे. लाडकी बहीण योजनेचा फायदा आम्हाला होईल.

**-वसंत बोराटे,** राष्ट्रवादी अ.प.




### पक्षनिहाय इच्छुकांची नावे:

**1. भारतीय जनता पार्टी :** माजी महापौर राहुल जाधव, सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव, निखिल बोऱ्हाडे, निलेश बोराटे, सोनम जांभुळकर, मंगेश हिंगणे. राकेश गायकवाड
**2. राष्ट्रवादी अ.प. गट :** वसंत बोराटे, कविता आल्हाट, अतिश बारणे, विशाल जाधव, विशाल आहेर, निलेश जाधव, घनश्याम जाधव.
**3. शिवसेना शिंदे गट :** अद्याप कोणी नाही.
**4. राष्ट्रवादी श.प. गट :** ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, राहुल बनकर, गौतम कुडूक.
**5. शिवसेना उबाठा गट :** रुपाली आल्हाट, गौरी घंटे, योगेश बोराटे, राजाभाऊ भुजबळ.
**6. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** अद्याप कोणी नाही.
**7. वंचित बहुजन आघाडी :** अनिल चौधरी

### प्रभागातील समाविष्ट भाग :

चिखली गावठाण भाग, रिव्हर रेसिडेन्सी, क्रिस्टल सिटी, स्वराज रेसिडन्सी, गंधर्व एक्सलन्स बनकर वस्ती, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी, राजे शिवाजीनगर, कुदळवाडी भाग इ.

### 2017 मधील विजयी उमेदवार:

अ - अश्विनी जाधव - भाजपा
ब – सारिका बो-हाडे - भाजपा
क राहुल जाधव - भाजपा
ड वसंत बोराटे - भाजपा (आता राष्ट्रवादी अ.प.)

2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग "रचना जैसे थे" आहे. प्रभाग क्रमांक २ मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 57 हजार 694 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 7 हजार 534 इतकी अनुसूचित जाती आणि 822 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये या प्रभागामध्ये भाजपाची मोठी लाट होती. या प्रभागातून भाजपाचे चारही उमेदवार निवडून आले होते. अश्विनी जाधव यांनी 8 हजार 334 मतांनी विजय मिळवला. शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर लढलेल्या रुपाली आल्हाट अवघ्या 48 मतांनी पराभूत झाल्या आहेत. रुपाली आल्हाट आता शिवसेना उबाठा गटाकडून प्रमुख दावेदार आहेत. भाजपाच्या सारिका बोऱ्हाडे ह्या ब- गटातून 9 हजार 512 मते मिळवत विजयी ठरल्या होत्या. तर, राष्ट्रवादीच्या कविता आल्हाट यांनी 'घड्याळ' चिन्हावर 5 हजार 834 आणि शिवसेनेच्या प्रतिभा जाधव यांनी 'धनुष्यबाण' चिन्हावर 5 हजार 18 मते मिळवली होती.

क- गटातून माजी महापौर राहुल जाधव यांनी 11 हजार 145 मते मिळवली होती. या गटातून शिवसेनेचे अंकुश जाधव यांनी 4 हजार 873 आणि राष्ट्रवादीचे निलेश जाधव यांना 3 हजार 12 मते मिळाली होती. ड- गटातून वसंत बाराटे यांनी भाजपाच्या तिकीटावर 10 हजार 868 मते घेतली होती. त्यांच्या गटात राहुल बनकर यांनी राष्ट्रवादीकडून 5 हजार 549 आणि शिवसेनेचे सचिन ठाकूर यांनी 2 हजार 970 मते मिळवली आहेत. या प्रभागातून मनसेनेही आपला उमेदवार लढवला होता. मनसेचे राहुल जाधव यांनी 1 हजार 118 मते घेतली होती.

भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे एकेकाळी कट्टर समर्थक असलेले वसंत बोराटे यांनी 2022 मध्ये महापालिका प्रस्तावित निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यानंतर भाजपाने या ठिकाणी निलेश बोराटे आणि निखिल बोऱ्हाडे यांना मोठी ताकद दिली आहे. आगामी निवडणुकीत राष्ट्रवादीचा 'वसंत' बहरणार की राष्ट्रवादीला रा'हुल' देत भाजपा पुन्हा 'चौकार' मारणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दरम्यान, 2017 च्या आरक्षणानुसार, अ- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ब- सर्वसाधारण महिला, क- सर्वसाधारण आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्के आरक्षण आहे.

शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# श्रद्धा, संस्कृती आणि सेवाभावाचा 25 वर्षांचा यशस्वी प्रवास

## संभाजीनगर दत्त मंदिराचा रौप्यमहोत्सव सोहळा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**समाजसेवा, श्रद्धा आणि संस्कृती जपणाऱ्या संभाजीनगर दत्त मंदिराने आपल्या २५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा रौप्यमहोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात साजरा केला. श्री गुरुदत्त सेवा मंडळाच्या नेतृत्वाखाली मंदिराने गेल्या अडीच दशकांत केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे.**





१९९७ साली विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर सुरू झालेला हा प्रवास, आज भव्य मंदिर, अनेक उपक्रम आणि समाजाभिमुख कार्यांमुळे शहरासाठी एक प्रेरणास्थान ठरला आहे. मंदिराच्या स्थापनेपासून ते भव्य स्वरूप प्राप्त होईपर्यंत नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, कार्यकर्त्यांची मेहनत आणि श्रद्धाळूंचा विश्वास हे घटक महत्त्वाचे ठरले.

रौप्यमहोत्सवी कार्यक्रमात नारायणपूर दत्त मंदिराचे विश्वस्त टेंबे स्वामी महाराज आणि भरत नाना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कीर्तन, प्रवचन, हवन आणि भव्य महाप्रसाद यांचे आयोजन करण्यात आले. मंदिर प्रांगणात धार्मिक उत्साह आणि सांस्कृतिक रंग यांचा संगम दिसून आला.

या मंदिराने दरवर्षी दत्त जयंती, रामनवमी, हनुमान जयंती यांसारखे धार्मिक उत्सव तर साजरे केलेच, पण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, महिलांसाठी हळदी-कुंकू, आरोग्य शिबिर, बालसंस्कार केंद्र, योगवर्ग, संस्कृत शिकवणी यांसारखे समाजोपयोगी उपक्रमही सातत्याने राबवले. देहू-पंढरपूर दिंडीसाठी सेवा कार्य हे मंदिराचे विशेष वैशिष्ट्य ठरले आहे.

### प्रवास पंचवीस वर्षांचा!

२५ वर्षांच्या या प्रवासात भव्य सभामंडप, ध्यानगृह, ग्रंथालय, चांदीची पालखी, सोन्याचे मुकुट, सीसीटीव्ही सुरक्षेसह अनेक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या.

### "सेवा हीच पूजा"

सेवा हीच पूजा असा अखंड संदेश देत मंदिराने भक्ती आणि समाजसेवेचा संगम साधत एक आदर्श निर्माण केला आहे. आज हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ न राहता, संस्कार, सेवाभाव आणि श्रद्धेचे केंद्रबिंदू बनले आहे.




College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046